महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क.नाविम प.मा./प.उ.मा./ 3905
नागपूर, दिनांक 08/12/2023

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य.
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय
नागपूर विभाग, नागपुर
(भंडारा,चंद्रपुर,नागपुर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया.)

विषयः— माध्यमिक शालान्तं प्रमाणपत्र (इ. 10 वी) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) फेब्रु / मार्च–2024 परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा–या खाजगी विद्यार्थ्याचे नावंनोदणी अर्ज अतिविलंब शुल्काने स्विकारण्याच्या तारखाबाबत.

संदर्भ : — 1)राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क रा. म/परीक्षा–8/5302 ,दिनांक – 08/12/2023. चे पत्र.
2) राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क रा. म/परीक्षा–8/5303 ,दिनांक – 08/12/2023. चे पत्र.

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु–मार्च २०२४ च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज अतिविलंब शुल्काने मंगळवार दिनांक ०७/११/२०२३ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याच्या तारखा निश्चित करण्यात आल्या होत्या, सदर अतिविलंब शुल्काने अर्ज सादर करण्याच्या तारखांना खालीलप्रमाणे अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे —

अतिविलंब शुल्कासह अंतिम मुदत

| | |
|---|---|
| इ. १०वी व इ. १२वी अतिविलंब शुल्क प्रति विद्यार्थी प्रति दिन रु २०/– स्वीकारुन नावनोंदणी अर्ज सादर करण्याच्या तारखा | सोमवार दिनांक ११/१२/२०२३ ते बुधवार दिनांक २०/१२/२०२३ |

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत. सदर सूचना वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

संकेतस्थळ — इ. १०वी — http://form17.mh-ssc.ac.in
इ. १२वी — http://form17.mh-hsc.ac.in

१ अतिविलंब शुल्कासह प्राप्त झालेले नावनोंदणी अर्ज व विहित शुल्क व मुळ कागदपत्रांसह त्यावर SUPERLATE FORM शेरा लिहून शुक्रवार दिनांक २२/१२/२०२३ रोजी माध्यमिक शाळांनी व कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे हस्तपोच जमा करावेत. यासंदर्भातील सूचना लेखा शाखेला देण्यात याव्यात.

ers\HP\OneDrive\Desktop\Avedanpatra12.docx6

२ यापूर्वी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुनही नावनोंदणी अर्ज विहित शुल्क व मूळ कागदपत्रांसह जमा न केलेल्या विद्यार्थ्यांस पुनःश्च नावनोंदणी अर्ज भरुन सर्व विहित प्रक्रिया करणे अनिवार्य राहील.

३ खाजगी विद्यार्थी नावनोंदणीकरीता अतिविलंब शुल्काने अर्ज करण्याची अंतिम मुदत बुधवार, दि. २०/१२/२०२३ पर्यंत असणार आहे. त्यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व संबंधित घटकांनी नोंद घेण्याबाबत विभागीय मंडळ स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

४ विभागीय मंडळास प्राप्त झालेल्या अतिविलंब खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्जाची तपासणी मंगळवार दि.२६/१२/२०२३ पर्यंत करावी व त्यातील पात्र/अपात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करुन ऑनलाईन शाखा, राज्यमंडळ यांचेकडे http://division.mh-ssc.ac.in या पोर्टलवर तसेच stateboardonline@gmail.com या ई-मेलवर सादर करावी.

५ अतिविलंब शुल्काने प्राप्त झालेल्या नोंदणी अर्जाची छाननी त्वरीत करून पात्र विद्यार्थ्यांची यादी ऑनलाईन शाखेस सादर करावी म्हणजे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना परीक्षेची आवेदनपत्रे भरणे सुलभ होईल.

सोबत परीपत्रकाची प्रत

(बी. आर. रोकडे)
प्र. विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर